आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ फेब्रुवारी २०२५ शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत २६ वर्षांनंतर भाजपाची बहुमताकडे वाटचाल

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर

- आर्थिक विकासाकरता  आणि महागाईच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत असल्याचं केंद्रीय़ अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे महाराष्ट्राचं पदकांचं शतक पूर्ण

**आणि**

- ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांचं निधन

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत  भाजपाने मुसंडी मारली असून आत्तापर्यंत अधिकृतरीत्या चार जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. भाजपाला चार आणि आम आदमी पार्टीला प्रत्येकी तीन जागा मिळाल्या आहेत. हाती आलेल्या कलांनुसार भाजपा ४५ तर आम आदमी पार्टी २१ जागांवर आघाडीवर आहे.  काँग्रेसचा पूर्णपणे धुव्वा उडाला असून त्यांना एकाही जागी विजय मिळवता आलेला नाही. भाजपा २६ वर्षांनंतर पुन्हा एकदा दिल्लीत सत्तेत येत असल्यामुळे भाजपाच्या गोटात आनंदाचं वातावरण आहे. दिल्लीतल्या भाजपा कार्यालयात कार्यकर्ते फटाके वाजवून आणि मिठाई वाटून विजय साजरा करत आहेत.

आपचे अनेक दिग्गज उमेदवार पराभवाच्या छायेत असून भाजपा मुख्यालयात जल्लोष सुरू झाला आहे. शालिमार बाग मतदारसंघातून भाजपाच्या रेखा गुप्ता विजयी झाल्या आहेत.

दिल्ली कॅन्टोन्मेंटमधून आपचे विरेंदर सिंग विजयी झाले आहेत. नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपाचे परवेश सिंग यांनी आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्याविरूद्ध निर्णायक आघाडी घेतली आहे. जंगपुरा मतदारसंघात भाजपाचे नेते तरविंदर सिंग मारवा यांनी आपचे ज्येष्ठ नेते मनीष सिसोदिया यांच्याविरूद्ध निर्णायक आघाडी घेतली आहे. आपचे उमेदवार कुलदीप कुमार यांनी कोंडलीची जागा ६ हजार मतांनी जिंकली आहे. त्यांनी भाजपाच्या कुलदीप गौतम यांचा पराभव केला आहे. राजौरी गार्डनची जागा मनजितसिंग सिरसा यांना मिळाली आहे.

कालकाजी मतदारसंघातून आपच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी निर्णायक आघाडी घेतली आहे. सोमनाथ, भारती, सौरभ भारद्वाज आणि अवध ओझा हे आपचे प्रमुख नेते पिछाडीवर आहेत. भाजपाचे मोहन सिंग बिश्त हे मुस्तफाबाद मतदारसंघातून ४१ हजार मतांनी आघाडीवर आहेत. विश्वासनगरमधून तीनवेळा निवडणूक जिंकलेले भाजपाचे नेते ओम प्रकाश शर्मा आघाडीवर आहेत. भाजपाचे अजय महावार आघाडीवर आहेत.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व उमेदवारांचं डिपॉझिट जप्त झालं आहे.

भाजपाचे तिलक राम गुप्ता यांनी त्रिनगर मतदारसंघात १४ व्या फेरीनंतर १५ हजार मतांनी आघाडीवर आहेत. कस्तुरबा नगरातून भाजपाच्या नीरज बसोया यांनी आघाडी घेतली आहे. अजय महावार पुढे आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांसोबतची धोरणात्मक, आर्थिक आणि तंत्रज्ञानविषयक भागीदारी आणखी बळकट करणं यावर त्यांच्या या दौऱ्यात मुख्य भर असणार आहे. राजनैतिकदृष्ट्या हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांच्या आमंत्रणावरून प्रधानमंत्री १० ते १२ फेब्रुवारी

दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहेत. पॅरिसमध्ये आयोजित एआय कृती शिखर परिषदेचं सह-अध्यक्ष पद ते भूषवतील. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व्यवस्थापनाचं भविष्य या विषयावर विविध राष्ट्रांचे नेते चर्चा करणार आहेत. एआयचा मूल्याधिष्ठित विकास, उपलब्धता, आणि नवोन्मेष अशा अन्य पैलूंवरही या परिषदेत चर्चा होणार आहे. मोदींच्या या दौऱ्यात ते फ्रान्सच्या नेतृत्वाशी संरक्षण, व्यापार, ऊर्जा सहकार्य इत्यादी मुद्द्यांवर तसंच द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यासंदर्भात चर्चा करतील. तसंच मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटन समारंभालाही ते हजेरी लावणार आहेत. फ्रान्सची भेट आटोपून १२ फेब्रुवारीला प्रधानमंत्री अमेरिकेला रवाना होतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही आठवड्यातच प्रधानमंत्री या देशाला भेट देत असल्यानं, त्यांचा अमेरिका दौराही फ्रान्सइतकाच महत्त्वाचा मानला जात आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत व्हिसा वर राहणाऱ्या आणि ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्या भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांना सिॲटल इथल्या फेडरल न्यायालयानं मोठा दिलासा दिला आहे. अमेरिकेचं जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्यासंदर्भातल्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या कार्यकारी आदेशाला न्यायालयानं अनिश्चित काळासाठी स्थगिती दिली आहे. ट्रम्प हे संविधानाचा दुरुपयोग करून धोरणात्मक डावपेच खेळत असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे. याआधी मेरीलँड इथल्या न्यायालयानंही अशाच प्रकारचा निर्णय दिला होता. एखादं सरकार धोरणात्मक डावपेच करून संविधानाशी छेडछाड करु शकत नाही, सरकारला जन्मसिद्ध नागरिकत्वासंदर्भात नियमांत बदल करायचा

असेल तर त्यासाठी सर्वप्रथम संविधानात सुधारणा करण्याच्या मार्गानेच जावं लागेल, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकी सरकारचे विशेष कर्मचारी एलन मस्क यांनी युनायटेड स्टेट्स एजन्सी ऑफ इंटरनॅशनल डेव्हलपमेंट संस्था बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर या संस्थेतल्या कर्मचाऱ्यांनी ३० दिवसांच्या आत अमेरिकेत परत यावं या निर्णयाला फेडरल न्यायालयानं फेटाळून लावलं आहे. परदेशात कार्यरत असलेल्या या संघटनेतल्या कर्मचाऱ्यांनी अमेरिकेत सरकारी खर्चानं परतण्यासाठी ३० दिवसांची प्रशासकीय रजा घ्यावी, असा आदेश ट्रम्प यांनी अचानक घेतला होता. या निर्णयामुळे परदेशातले अमेरिकी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना ३० दिवसांच्या आत मायदेशी परतण्यासाठी जोखीम पत्करावी लागेल तसंच विनाकारण खर्च सोसावा लागेल,  असं न्यायालयानं म्हटलं आहे. सीरिया किंवा अशा संकटग्रस्त देशांमधून लगेचच परतणं ही तितकी सोपी गोष्ट नव्हे, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशातल्या मिल्किपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपाचे चंद्रभानु पासवान आघाडीवर आहेत. तमिळनाडूतील पूर्व एरोड मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीची मतमोजणीही सुरू आहे. द्रमुक अर्थात द्रवीड मुन्नेत्र कळघमचे चांदिराकुमार व्ही सी हे आघाडीवर आहेत.

<><><><><>

आर्थिक विकासाकरता आणि महागाईच्या आव्हानाला  सामोरं जाण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँक एकत्र मिळून काम करत आहेत, असं केंद्रीय अर्थमंत्री

निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. दिल्ली इथं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्या आज बोलत होत्या.

महागाई असो किंवा विकासाचा मुद्दा असो चलनविषयक धोरण आणि वित्तीय धोरण हे समन्वयानं आखलं पाहिजे, तरच त्याचा जनतेला लाभ मिळेल, असं त्या म्हणाल्या.

पुढच्या आठवड्यात संसदेत नवीन प्राप्तिकर विधेयक आणलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातर्फे ‘कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च’ या विषयावर राष्ट्रीय सर्वेक्षण होणार आहे. या वर्षभरात ही पाहणी होणार असून निवडक कुटुंबांनी गेल्या वर्षभरात केलेल्या आरोग्यविषयक खर्चाबाबत माहिती संकलित करण्यात येईल. या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश, शासकीय आणि खासगी दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधा इत्यादीची माहिती गोळा करणं हा आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने पदकांची शंभरी पार केली आहे. महाराष्ट्राकडे सर्वाधिक १०७ पदकं असून त्यात २३ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ४५ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत फुटबॉल, मुष्टीयुद्ध आणि तिरंदाजी खेळांमध्ये काल विविध मणिपूर, आसाम आणि महाराष्ट्र या राज्यांनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन केलं. महिला मुष्टियुद्धात महाराष्ट्राच्या दिव्या पवारनं ४५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. तर

उत्तराखंडच्या निवेदिता कार्कीनं लाईट फ्लायवेट प्रकारात सुवर्ण पदक मिळवलं. महिलांच्या सांघिक टेनिसच्या अंतिम फेरीत, महाराष्ट्राने गुजरातवर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकलं, तर पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत, तामिळनाडूनं कर्नाटकला हरवून अव्वल स्थान पटकावलं. पुरूषांच्या फुटबॉलच्या अंतिम सामन्यात केरळने उत्तराखंडचा पराभव करत सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

<><><><><>

मुंबईत आयोजित एल ॲन्ड टी. मुंबई खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत माया राजेश्वरननं काल महिला एकेरीची उपांत्य फेरी गाठली. मायानं उपउपांत्य फेरीत जपानच्या मेई यामागूची हिचा पराभव केला. तर महिला दुहेरीत प्रार्थना थुंबारे आणि अरियाना हावतोनो यांच्या जोडी ने उपांत्य फेरीत एडल सिल्वा आणि एनास्तासिया तिखोनोवा या जोडीचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांचं आज पहाटे मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग. गो. जाधव पुरस्कार तसंच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार त्यांना मिळाला होता. प्रबोधनकार ठाकरे यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन त्यांनी केलं होतं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावंत यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

//<><><><><>//